नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 21/02/2024 (बुधवार) सायंकाळ

---

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक

दिनांक २१/०२/२०२४ रोजी रात्री ००.३० वा. दरम्यान पोलीस स्टेशन मौदा येथील स्टाफ पो. स्टे. मौदा हद्दीत अवैध रेती वाहतूकीस आळा घालणेकरिता पेट्रोलिंग करीत असताना भंडारा ते नागपूर NH-53 रोडवर १४ चक्का ट्रक क्र. MH-27/BX-5121 हा येताना दिसल्याने त्यांचा पाठलाग करून बोरगाव शिवारातील महादुला फाट्याजवळ ट्रकला थांबवून पाहणी केली असता ट्रक क्र. MH-27/BX-5121 मध्ये अंदाजे १५ ब्रास रेती मिळून आल्याने सदर ट्रक चालक **आरोपी नामे— नईम बेग ईस्माईल बेग वय ३४ वर्ष रा. गुलीस्तानगर अश्पाक किराणा स्टोअर जवळ अमरावती** यास ट्रक मधील रेतीचे रॉयल्टी बाबत विचारले असता त्यांनी रॉयल्टी नसल्याचे सांगितल्याने व सदरची रेती ही चोरीची असल्याची खात्री झाल्याने आरोपीचे ताब्यातून ट्रक क्र. MH-27/BX-5121 किंमती २५,००,०००/—रू. व त्यामधील १५ ब्रास रेती किंमती ७५,०००/—रू. तसेच आरोपीचे दोन मोबाईल किंमती २०,०००/—रू. असा एकूण २५,९५,०००/— रू. चा मुद्देमाल जप्त करून सदर आरोपी **१) नईम बेग ईस्माईल बेग वय ३४ वर्ष रा. गुलीस्तानगर अश्पाक किराणा स्टोअर जवळ अमरावती २) मोहम्मद तनवीर सलीम शेख वय २४ वर्ष, रा. नुरनगर सुन्नी मस्जीद जि. अमरावती ३) एम एच २७ बि एक्स ५१२१ चा मालक** यांचेविरुद्ध कलम ३७९, १०९, ३४ भा. द. वी. सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमिन महसुल स. सहकलम ४,२१, खाणी आणि खनिजे अधी. १९५७ सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ अन्वये पो. स्टे. मौदा येथे गुन्हा नोंद करणेत आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली उपविभागीय पो. अधिकारी कामठी विभाग पोलीस स्टेशन मौदा येथील ठाणेदार पो. नि. सतीशसिंह राजपूत, पो. हवा. संदीप कडु, पो. हवा. गणेश मुदमाळी, पो. हवा. रुपेश महादुले, पो.ना. दिपक दरोडे यांनी केली.

## पोस्टे जलालखेडा हद्दीतील अवैधरीत्या मोहाफुल गावठी दारू काढणाऱ्या इसमावंर कायदेशीर कारवाई

दिनांक २०/०२/२०२४ रोजी जलालखेडा पोलीस स्टेशनचे ठाणेदार सपोनि. सी.बी. चौहान PSI/ मनोज शेंडे, पोलीस अंमलदार संजय रिधोरकर, निलेश खेरडे, दिनेश जोगेकर, फिरोज शेख, शिवदास सौंदळे, शंकर आचट व होमगार्ड सैनिकांच्या मदतीने पोलीस स्टेशन परिसरात विशेष मोहीमे दरम्यान ०४ वेगवेगळया ठीकाणी दारूबंदी कायद्यांतर्गत कारवाया करण्यात आल्या त्यामध्ये ग्राम उमठा, साखरखेडा (फाटा), मालटेकडी, पारधी बेडा उमठा या ठीकाणी एकुण १४० लिटर मोहाफुल गावठी दारू किंमती ७०००/– रूपये व २६ निपा देशी दारू किंमत १५२०/– रूपयाचा मुद्देमाल असा एकुण ८५२०/– रूपयाचा मुद्देमाल पोलीसांनी जप्त केला व दारूबंदी कायद्यांतर्गत गुन्हे नोंद करून पुढील तपास ठाणेदार सपोनि. सी.बी. चौहान यांचे मार्गदशर्नात निलेश खेरडे व शिवदास सौंदळे हे करित आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधि. (काटोल विभाग काटोल) यांचे मार्गदर्शनात जलालखेडा पोलीस स्टेशनचे ठाणेदार सपोनि. सी.बी. चौहान साहेब व त्यांच्या पथकाने केली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर